# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.01.2026** **वार- शनिवार**

---

**रोजगार**

केंद्रीय सहकार आणि विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत पुण्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ग्रुप सेंटरवर अठराव्या टप्प्यातील रोजगार मेळावा आज आयोजित करण्यात आला. एकंदर 300 पैकी 25 युवकांना प्रातिनिधीक स्वरुपात मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं देण्यात आली. यावेळी बोलताना मोहोळ म्हणाले की गेल्या चार वर्षात दहा लाख युवकांना रोजगार देण्यात आला असून रोजगार मेळाव्याचा उद्देश यशस्वी होत आहे. सीआरपीएफ पुणेचे उपमहानिरीक्षक वैभव निंबाळकर यावेळी उपस्थित होते. सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी, एसएसबी, आसाम रायफल्स, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया, ईपीएफओ, आयआयजीएम या विभागांमध्ये युवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रशिक्षण**

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी दक्षिण कमांडच्या वतीनं औंध लष्करी स्थानकावर विशेष सज्जता प्रशिक्षण देण्यात येत आहे. दोन अधिकारी आणि दोन महिलांचा यामध्ये समावेश असून विशेषतः त्वरित प्रतिसाद संघाच्या कवायतींवर यामध्ये भर देण्यात आला आहे.

**मूटकोर्ट**

मूटकोर्ट स्पर्धांमुळं भविष्यातील निष्णात वकील, करतज्ज्ञ तयार होतात त्यामुळं महाविद्यालयीन स्तरावर अशा स्पर्धा नियमितपणे झाल्या पाहिजेत असं मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. इंडियन लॉ सोसायटी आणि कर सल्लागारांच्या संघटनेद्वारे आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय मुटकोर्ट स्पर्धेची अंतिम फेरी काल झाली, त्यावेळी ते बोलत होते. अंतिम फेरीतील दोन संघांनी पूर्व-जीएसटी उत्पादन शुल्क आदेशांची अंमलबजावणी, कर वर्गीकरण आणि अधिकार क्षेत्राशी संबंधित गुंतागुंतीच्या कायदेशीर मुद्यांवर युक्तिवाद सादर केला. अप्रत्यक्ष कर कायद्यावर आधारित ही देशातील एकमेव राष्ट्रीय मूटकोर्ट स्पर्धा म्हणून ओळखली जाते. डिसेंबर-जानेवारी महिन्यात झालेल्या प्राथमिक, उपांत्यपूर्व आणि उपांत्य फेऱ्यांनंतर दोन संघ अंतिम फेरीत दाखल झाले होते.

**गोखले**

नामवंत मराठी लेखिका शुभदा गोगटे यांचं आज पहाटे पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. त्या 82 वर्षांच्या होत्या. त्यांनी देहदानाचा संकल्प केला होता. विज्ञान काल्पनिकेपासून लिखाणाला सुरुवात केल्यानंतर यंत्रायणी या त्यांच्या पहिल्याच कादंबरीला 1983 यावर्षी महाराष्ट्र सरकारचा साहित्य पुरस्कार मिळाला. त्यांच्या अनेक विज्ञान आणि गूढ कथा प्रकाशित झाल्या आहेत. साहित्य अकादमी आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास यांनी प्रकाशित केलेल्या भारतीय वैज्ञानिक कथांच्या प्रातिनिधिक संग्रहांत त्यांच्या विज्ञान कथांचा समावेश आहे. शुभदा गोगटे यांच्या भारतातील रेल्वे इतिहासाच्या पार्श्वभूमीवर आधारित ‘खंडाळ्याच्या घाटासाठी’ आणि ‘सांधा बदलताना’ या दोन कादंबऱ्या बऱ्याच गाजल्या. ‘खंडाळ्याच्या घाटासाठी’ या कादंबरीला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ह. ना. आपटे पुरस्कार तसंच मृण्मयी पुरस्कार मिळाला होता. याशिवाय त्यांचं डॉक्टर जगदीश हिरेमठ यांच्या ‘रिव्हरसिंग द हार्ट डिसीज’ या कार्यक्रमावर आधारित ‘हृदयविकार निवारण’ हे उपयुक्त पुस्तक अतिशय लोकप्रिय झालं.

**जप्ती**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात  येत आहे. आतापर्यंत शहरातील 35 मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून, 133 थकबाकीदारांची नळ जोडणी खंडित करण्यात आली आहे. उर्वरित थकबाकीदारांनी जप्तीची कारवाई टाळण्यासाठी तत्काळ थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा, असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**महापौर**

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापौर आणि उपमहापौर निवडीसाठी शुक्रवार, 6 फेब्रुवारी ही तारिख निश्चित करण्यात आली आहे. या विशेष सभेचा कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येईल असं आयुक्त नवल किशोर राम यांनी एका प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**कार्यक्रम**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानं राज्यातील विविध ठिकाणी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. पुणे महसूल विभागासाठी 'वंदे मातरम्' हा देशभक्तीपर गीत आणि नृत्याविष्काराचा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजता पुण्यातील औंध इथं पंडित भीमसेन जोशी नाट्यमंदिरात आयोजित करण्यात आला आहे.

**शाफुआ-संमेलन**

पुण्याजवळील भोर इथं उद्या होणाऱ्या 11व्या फुले-शाहू-आंबेडकर विचारप्रसार साहित्य संमेलनाची सर्व तयारी पूर्णझाली असून 'क्रांतिसिंह नाना पाटील विचारनगरी' मंथनासाठी सज्ज झाली असल्याचीमाहिती कार्याध्यक्ष डॉ. रोहिदास जाधव, स्वागताध्यक्षप्राचार्य सुरेश खराते आणि संयोजन समितीच्या अध्यक्ष हसीना शेख यांनी दिली

**जेंडर**

जेंडर या समलिंगी डेटिंग ॲपवरुन संपर्क करुन तरुणांना बोलावून आणि त्यांना चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या टोळीला कोंढवा पोलिसांनी सापळा रचून पकडलं आहे. याबाबत एका तरुणानं पोलिसांकडे तक्रार केली होती.

**सिगारेट**

पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकानं प्रतिबंधित असलेल्या आठ लाख रुपये किंमतीच्या ईलेक्ट्रिक सिगारेट्स जप्त केल्या आहेत. सहा वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून हे साठे जप्त करण्यात आले असून यासंदर्भात तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 30 तर किमान 15 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**